# स्वामी विवेकानंद यांच्या जन्मोत्सवानिमित्त व्याख्यान

मू.जे महाविद्यालयातील तत्वज्ञान विभाग व भारतीय दार्शनिक अनुसंधान परिषद आयोजित  स्वामी विवेकानंद यांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित एक दिवसीय व्याख्यानात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.उदय कुलकर्णी, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ.सुरेश तायडे, समन्वयिका डॉ. प्रज्ञा जंगले, तत्वज्ञान विभागप्रमुक डॉ.रजनी सिन्हा उपस्थित होते.

प्रस्तावना डॉ.रजनी सिन्हा यांनी केली.




"वर्तमान संदर्भात स्वामी विवेकानंदांचे धर्मविषयक तत्वज्ञान" या विषयी डॉ. मोरे यांनी मांडणी केली. यात त्या म्हणाल्या की, "स्वामी विवेकानंद यांची "सार्वत्रिक धर्म" ही संकल्पना वैश्विक होती. सर्व धर्मामध्ये सदभावना वाढीस लागली पाहिजे. स्वामी विवेकानंद यांचे विचार आधुनिक काळात देखील समाजात मार्गदर्शक ठरत आहे. असे सांगून डॉ.मोरे यांनी स्वामी विवेकानंद यांचे जीवन जगण्याविषयीचे तत्वज्ञान मांडले.

अध्यक्षीय भाषण डॉ.कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.हर्षल साळुंखे यांनी तर आभार प्रा.नरेंद्र भोई यांनी केले.